महाराष्ट्र शासन
वन विभाग

# वनसंरक्षक (प्रादेशिक),गडचिरोली यांचे कार्यालय.

वन प्रशासकीय भवन, पोटेगांव रोड, गडचिरोली (महाराष्ट्र)
दुरध्वनी क्रमांक - 07132-233184 फॅक्स क्रमांक & 07132-233187 Email-ccfgad@gmail.com

क्रमांक:-कक्ष-2(8)/जमीन/प्र.क्र.206/2023/जा.क्र.2986 गडचिरोली, दिनांक :- 8 .11.2023

प्रति,

उप वनसंरक्षक (प्रा.),
भामरागड वनविभाग, स्थित आलापल्ली

विषय:- वन संवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत वनजमिन गडचिरोली क्षेत्र 5.00 हे.
मौजा भामरागड ता. भामरागड जि. गडचिरोली येथिल पोलिस स्टेशनसाठी ईमारत व पोलिसांसाठी निवासस्थाने बांधण्यासाठी वनजमिन वळतीकरणेबाबतचा प्रस्ताव.

संदर्भ:-1) भारत सरकार, पर्यावरण, एंव जलवायु परिवर्तन मंत्रालय, यांचे पत्र क्र. F.No. FC-II/MH-208/2023-NGP/11381 दि.31.03.2023
2) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, म. रा., नागपूर यांचे कार्यालयाच पत्र क्र. कक्ष- 17/NC/Gad/ID-12652/44/ 2023-24 दिनांक 05.04.2023
3) उपवनसंरक्षक (प्रा.),भामरागड यांचे कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष 1/सर्व्हे/प्र.क्र.391/1702 दि.28.09.2023 प्राप्त दि.28.09.2023 प्राप्त दि. 09.10.2023
4) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष 2(8)/जमीन/प्र.क्र.413/904 दि. 18.10.2023
5) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, म. रा., नागपूर यांचे कार्यालयाच पत्र क्र.कक्ष- 17/NC/Gad/ID-12652/2250/ 2023-24 दिनांक 27.10.2023

----000----

वन संवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत वनजमिन क्षेत्र 5.00 हे. भामरागड ता. भामरागड जि. गडचिरोली येथिल पोलिस स्टेशनसाठी ईमारत व पोलिसांसाठी निवासस्थाने बांधण्यासाठी वनजमिन वळती करणेबाबतचा प्रस्ताव केंद्रस्थ अधिकारी यांचे कार्यालयात सादर करण्यात आलेला आहे. त्यांचे कार्यालयाकडुन प्रस्ताव योग्य मार्गे केंद्र शासनाकडे मंजुरीकरीता सादर करण्यात आला आहे.

केंद्र शासनाचे संदर्भिय पत्र क्र. 1 मध्ये नमुद 1 ते 10 मुद्यांची पुर्तता करण्याकरीता या कार्यालयास संदर्भिय पत्र क्र. 2 प्रमाणे कळविले आहे.

प्रकरणी, उपवनसंरक्षक भामरागड यांनी संदर्भिय पत्र क्र. 3 प्रमाणे केंद्र शासनाच्या पत्रात नमुद 1 ते 10 मुद्यांचा अनुपालन अहवाल KML CD सह 03 प्रतित या कार्यालयात सादर केलेला होता. त्याप्रमाणे या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. 4 प्रमाणे केंद्र शासनाच्या पत्रात नमुद मुद्यांचा अनुपालन अहवाल KML CD सह अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी म.रा. नागपुर यांचे कार्यालयात संदर्भिय पत्र क्र. 5 प्रमाणे सादर करण्यात आलेला होता.सदर अहवालाची तपासनी केली असता, 03 मुद्यांवर अहवाल परीपुर्ण करुन सादर करण्याकरीता या कार्यालयास कळविण्यात आलेले आहे.

प्रकरणी, उपवनसंरक्षक (प्रा.), भामरागड यांनी संदर्भिय पत्र क्र. 5 प्रमाणे पत्रात नमुद असल्याप्रमाणे मुद्या क्र. 1, 2 व 3 च्या खुलाशासह परीपुर्ण अहवाल आंग्ल भाषेत 04 प्रतित या कार्यालयात सादर करावा. यासोबत संदर्भिय पत्र क्र. 5 ची प्रत देण्यात येत आहे. तसेच अहवालासह 03 प्रतित परत करण्यात येत आहे.

(गणेश एन. पाटोळे)
विभागीय वन अधिकारी (दक्षता)
वनसंरक्षक, (प्रादेशिक)गडचिरोली,
यांचे कार्यालय.

प्रतिलीपी:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य, नागपुर यांना माहीतीस सादर.
प्रतिलीपी:- पोलिस अधिक्षक, गडचिरोली यांना उचित कार्यवाहीस अग्रेषित.

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, बी विंग, पहिला माळा
"वनभवन", सिव्हील लाईन्स, रामगिरी रोड, नागपूर ४४०००१
दुरध्वनी क्र.०७१२-२५५६९१६, ई-मेल-apccfnodal@mahaforest.gov.in

ई-मेलव्दारे / स्पिडपोस्टव्दारे

क्र.कक्ष-१७/FCA-S१/PID-२७७०८/गडचिरोली/2240
नागपूर ४४० ००१, दिनांक 26 /१०/२०२३

मुख्य वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली
02 NOV 2023
गडचिरोली वनवृत्त, गडचिरोली
आवक क्र.

1071
2/11/2023

1126
2/11/23

प्रति,
वनसंरक्षक (प्रा.),
गडचिरोली

विषय :- Proposal for diversion of 5.0 ha. forest land under Forest (Conservation) Act, 1980 in favour of Superintendent of Police, Gadchiroli for construction of Police Station and Residential Quarters for Police in Compt. No.706 at Village-Bhamragad, District-Gadchiroli in the State of Maharashtra-regarding.

संदर्भ :-
1. Government of India, MoEF&CC, Integrated Regional Office, Nagpur letter dated 31/03/2023 of F.No.FC-II/MH-208/2023-NGP/11381.
2. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१७/नोडल/गडचिरोली/आयडी-१२६५२/४४/२०२३-२४, दि.०५/०४/२०२३.
3. वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली यांचेकडील पत्र क्र.कक्ष-२(८)/जमीन/प्र.क्र.२०६/९०४, दि.१८/१०/२०२३.

विषयांकित प्रकरणी केंद्र शासनाकडील संदर्भ क्र.१ येथे नमुद पत्रान्वये उपस्थित केलेल्या १० मुद्यांच्या पुर्ततेसाठी आवश्यक असलेल्या दस्तऐवजांसह अहवाल, मुद्देनिहाय पुर्ततेच्या अनुषंगाने विभागीय व वृत्तस्तरीय कार्यालयाच्या आंग्ल भाषेतील अभिप्रायासह तीन प्रतीत या कार्यालयास सादर करणेबाबत या कार्यालयाचे संदर्भ क्र.२ येथे नमुद पत्रान्वये निर्देश देण्यात आले होते.

त्यानुषंगाने आपलेकडील संदर्भ क्र.३ येथे नमुद पत्रान्वये सादर करण्यात आलेल्या अहवालाची तपासणी केली असता, खालील त्रूट्या आढळून येत आहे.

१. मुद्दा क्र. **i, iii, v, vi, vii, ix** व **x** ची पुर्तता झालेली नाही.
२. मुद्दा क्र. **v** च्या पुर्ततेसाठी कराव्या लागणा-या वृक्षतोडीबाबतच्या अचूक आकडेवारीसह स्थळ निरीक्षण अहवाल सादर करण्यात आलेला नाही.
३. मुद्दा क्र. **iv, v, vi** च्या पुर्ततेसाठी विभागीय कार्यालयाचे स्पष्टीकरण सादर करण्यात आलेले नाही.

उपरोक्त नमुद मुद्यांच्या पुर्ततेसह परिपुर्ण अहवाल, सादर करण्यात आलेल्या अहवालाची पुनर्रचना करून मुद्दा क्र.१ ते १० च्या मुद्देनिहाय पुर्ततेच्या अनुषंगाने विभागीय व वृत्तस्तरीय कार्यालयाच्या आंग्ल भाषेतील अभिप्रायासह, आवश्यक दस्तऐवजासह व प्रस्तावित वळतीकरणाचे क्षेत्र व प्रस्तावित पर्यायी वनीकरणाचे क्षेत्र दर्शविणा-या KML file सह तीन प्रतीत या कार्यालयास सादर करण्यात यावा, जेणेकरून त्यानुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

सहपत्र:- प्राप्त अहवालाच्या दोन प्रती.

27/10/23

(नरेश झुरमुरे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी

प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक, भामरागड वनविभाग, आलापल्ली यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस.
प्रतिलिपी:- पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
(E-mail address: sp.gadchiroli@mahapolice.gov.in)